(CNRMHSN110006842018)

**नियमित दिवाणी दावा क्र.१०९/२०१८**

**निशाणी २९ सोबत**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास वकील श्री.डी.एस.पाटील यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

६. माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रावर माझी सही असून त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिलेल्या कैफियतीमधील मजकूर खोटा आहे. आटपाडी दुय्यम निबंधक कार्यालयात झालेला दस्त क्र.४१२/२०१४ चे वेळी मी हजर होतो. सदर दस्त मापटेमळा येथील गट नं.२३४ बाबत करण्यात आलेला आहे. सदर मिळकत सुर्यकांत महादेव माळी यांचेकडून मी घेतलेली आहे. सदरचा दस्त तोच असून त्यावर माझी आणि सुर्यकांत माळी यांची सही आहे. तसेच त्यावर साक्षीदार आणि ओळखदार यांच्या सह्या असून त्या सह्या मी ओळखतो. सदर खरेदीपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा दस्त सुर्यकांत महादेव माळी यांचे सांगणेवरुन लिहिलेला आहे. सदर दस्ताप्रमाणे मिळकतीचा ताबा व कब्जेवहिवाट माझेकडे आहे. सदर दस्ताला **<u>निशाणी क्र.३५</u>** देण्यात येते.

७. आटपाडी दुय्यम निबंधक कार्यालयात झालेला दस्त क्र.७९६/२०१४ चे वेळी मी हजर होतो. सदर दस्त मापटेमळा येथील गट नं.१२४, १२६ व २०० बाबत करण्यात आलेला आहे. सदर मिळकती सुर्यकांत महादेव माळी यांचेकडून मी घेतलेल्या आहेत. सदरचा दस्त तोच असून त्यावर माझी आणि सुर्यकांत माळी यांची सही आहे. तसेच त्यावर साक्षीदार आणि ओळखदार यांच्या सह्या असून त्या सह्या मी ओळखतो. सदर खरेदीपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदरचा दस्त सुर्यकांत महादेव

माळी यांचे सांगणेवरुन लिहिलेला आहे. सदर दस्ताप्रमाणे मिळकतीचा ताबा व कब्जेवहिवाट माझेकडे आहे. सदर दस्ताला **निशाणी क्र.३६** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वकील श्री.पी.जी.शिंदे यांचेमार्फत सुरु**

८. मी मापटेमळा येथील रहिवाशी आहे. प्रतिवादी हे मापटेमळा येथील रहिवाशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी आणि माझ्या जमीन मिळकती जवळ जवळ आहेत. महादेव माळी यांना मी माझ्या लहानपणापासून ओळखतो. ते आमचे शेजारी आहेत. माझे वय आता ३४ वर्ष असून माझे शिक्षण दहावीपर्यंत झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, महादेव माळी यांची दोन लग्ने झाली आहेत. मला याची माहिती नाही की, महादेव यांची पहिली पत्नी पारुबाई आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, पारुबाईची मुलगी ही राहीबाई आहे. हे म्हणणे खरे आहे की, महादेव यांची दुसरी पत्नी यशोदा उर्फ पारुबाई ही आहे. हे म्हणणे खरे आहे की, महादेव यांना दुस–या पत्नीपासून चंद्रकांत, सुर्यकांत, शशिकांत ही मुले आणि संपदा ही मुलगी अशी मुले झाली.

९. निशाणी ३५ वरील दस्त क्र.४१२/२०१४ हा गट नं.२३४ बाबत झाला. गट नं.२३४ चा ७/१२ उतारा मी खरेदीपत्रापूर्वी काढून पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सुर्यकांत याला सदर मिळकत त्याच्या वडीलांकडून आलेली होती. गट नं.२३४ ही मिळकत कोर्टाच्या हुकूमाने सुर्यकांत यांच्याकडे आली होती. सदरचा हुकूमनामा हा खरेदीपत्रापूर्वी मी पाहिला होता. कोर्टाचा हुकूमनामा म्हणजे त्यांच्या जमीनी त्यांनी कोर्टाकडून वाटप करुन घेतलेल्या होत्या. सदरच्या मिळकतीचे त्यांनी वडीलांकडून वाटप

करुन घेतले होते. सदर वाटप दाव्याचा नंबर मला माहिती नाही. प्रस्तुत दाव्याच्या कामी मी सदर वाटप दाव्यामधील तडजोड मी हजर केलेली आहे. मला याची माहिती नाही की, सदरची वाटप तडजोड कोणाकोणा दरम्यान झालेली आहे. महादेव यांच्या सर्व वारसांच्यामध्ये वाटप झाले अशी ती तडजोड होती. सदरची वाटप तडजोड मी वाचून पाहिलेली आहे. सदर तडजोडीमध्ये महादेव यांची पहिली पत्नी पारुबाई व त्यांची मुलगी राहीबाई यांना पक्षकार केल्याचे मला वाचायला मिळाले नाही. महादेव यांची दुसरी पत्नी यशोदा यांची मुलगी संपदा यांना सदर वाटपाच्या दाव्यामध्ये पक्षकार केलेले नव्हते. महादेव हे एकटेच होते. महादेव यांना सख्खे भाऊ नव्हते. महादेव यांना सख्या बहिणी होत्या किंवा कसे याची मला माहिती नाही.

**वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2024.11.12 17:10:54 +0530

आटपाडी.

दिनांक : १२/११/२०२४

(अ. जो. बाचुळकर)

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****